# विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १७५ /२०२४ दि. १४/०९/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, विठ्ठलवाडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. दि. १९/०९/२०२४ रोजी १३ दिवसांचे गणपती विसर्जन करीता मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर मिरवणूक श्रीराम चौक, उल्हासनगर ४ येथे समाप्त होणार आहे. या कालावधीत नमूद विसर्जन व मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) व्हिनस चौक कडून मेन मार्केट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **व्हिनस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने व्हिनस चौक कडून डावीकडे वळून माणेरेगाव व्हि.टी.सी. रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) श्रीराम चौक कडून मेन मार्केट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शासकीय हॉस्पिटल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **३) श्रीराम चौक कडून** ओ.टी. सेक्शन मेन मार्केट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्रीराम चौक** पेट्रोल पंप येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने श्रीराम चौक पेट्रोल पंप येथून व्हि.टी.सी. रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. १९/०९/२०२४ रोजी (१३ दिवसाचे गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम) सायंकाळी १५:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ व ४ व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत</u> :— पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर**
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u> :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे**
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**
सपोआ उल्हासनगर वाहतूक विभाग व कल्याण, पोनि. उल्हासनगर, विठ्ठलवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/— उल्हासनगर म.न.पा. संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.